महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/ 961
नागपूर, दिनांक :– 15 /03/2023

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– मार्च–एप्रिल 2023 मध्ये आयोजित माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भः– 1. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं./परीक्षा–7/1236 दि. 15/03/2023.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, मार्च–एप्रिल 2023 मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

प्रतिलिपीः–

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3 शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.
4) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.........................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय– मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक , शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

विविध स्तरावरून मागणी होत असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे प्रस्ताव सादर करण्यास यापूर्वी दि. ८ फेब्रुवारी, २०२३ अशी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे निर्धारीत करण्यात आलेल्या वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता आले नसल्याने तसेच कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सोमवार, दि. २० मार्च, २०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माध्यमिक शाळांकडून स्विकारण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदतवाढ अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी उपरोक्त विहीत मुदतीत सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)

सचिव

राज्यमंडळ, पुणे–०४

दिनांक : १५/०३/२०२३